REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# मराठी लघुअनियतकालिकांतील कविता



**प्रमोद भाऊरावजी लेंडे**
**संशोधक विद्यार्थी , स्नातकोत्तर मराठी विभाग,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.**

लघुअनियतकालिक हा शब्द 'लिटल मॅगझिन' या इंग्रजी शब्दाचा पर्याय होय. त्यालाच लघुकालिक, लघुपत्रिका अनियमितंक असेही पर्याय वापरल्या गेलेत. 1955 साली मराठी साहित्यात लघुअनियतकालिकांना सुरूवात झाली. रमेश समर्थ हयांनी 'शब्द' हया नावाचे मराठीतील पहिले लघुअनियतकालिक संपादित केले. 1960 ते 1970 हे दशक लघुअनियतकालिकांसाठी अत्यंत समृध्द असे दशक ठरले.

लघुअनियतकालिकांतील कविता 'संतप्त तरूण पिढीची' कविता होय. जीवनाचा वेगळा अनुभव, निराळा अर्थ शोधणारी प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द संताप व्यक्त करणाऱ्या तरूण पिढीची एक नवी लढाई व चळवळ वाङ्मयीन विद्रोहातून उभी राहिली. ती चळवळ म्हणजे लघुअनियतकालिकांची चळवळ होय. मुंबई हया महानगरातून व महानगरीय अक्राळविक्राळ, बकाल जीवनातून उभी राहणारी वाङ्मयीन चळवळ होय. साहित्य क्षेत्रातील प्रस्थापितांच्या मक्तेदारीला झुगारून नव्या स्फुर्तीच्या प्रक्षोभक जाणिवा या कवितेने व्यक्त केल्या.

जवळजवळ 70 ते 100 इतकी संख्या लघुअनियतकालिकांची होती. ही संख्या लक्षात घेता किती अफाट पिक असावे हे लक्षात येते. यामध्ये 'शब्द', 'दिशा', 'नवे लेखन', 'रूपगंधा', 'रूप', 'रंग + ललित रंग', 'अथर्व', 'असों', 'आता', 'भारूड', 'हेमा', 'अक्षरे', 'फक्त', 'टिंब', 'तापसी', 'येरू', 'वाचा', 'कावळा', 'चक्रवर्ती', 'स.न.वि.वि.', 'श्री शब्द', 'अबकडई', 'शब्दकार', 'ऐसा जे', 'शून्य', 'अर्णव', 'अर्णवतरंग', 'पाणंद', 'अन्वय', 'पृथक', 'त्रिशंकू', 'रावा', 'लहर', 'समग्र', 'लृ', 'विद्रोह', 'विविधा', 'गारूडी', 'दिंडी', 'प्रयोजन', 'क्षितिज', 'शब्दागार', 'आदिम', 'कविता', 'आस्था', 'अजिंक्य', 'अक्षरछाया', 'साहित्यसंवाद', 'ब्र', 'धुमकेतू', 'उद्‌गार', 'झौझंझः' व 'संवाद' इत्यादी लघुअनियतकालिकांनी हया कालखंडामध्ये आपल्या पृथगात्मतेने लक्ष वेधून घेतले.

रमेश समर्थ, सतीश काळसेकर, वसंत गुर्जर, अरूण खोपकर, मनोहर ओक, विजय कारेकर, चंद्रकांत खोत, अशोक शहाणे इत्यादी संपादकांनी विविध लघुअनियतकालिकांना सुरुवात केली. लघुअनियतकालिकांच्या निर्मितीमागील भूमिका त्यांनी 'अबकडई' हया लघुअनियतकालिकांच्या शेवटच्या अंकात मुलाखतीच्या माध्यमातून मांडलेली आहे. लघुअनियतकालिकांचे संपादन करीत असताना विविधांगी अनुभवांचे संपादकीय लिहिल्या गेलीत त्यामधूनही निर्मिती मागची भूमिका विषद होताना दिसून येते. प्रस्थापित वाङ्मयीन चळवळीच्या विरूध्द दंड थोपटण्याचे कार्य हया अनियतकालिकांनी केले आहे. नव्या विचारातून जन्माला आलेली वाङ्मयीन पिढी नवा विचार करू लागली. साहजिकच त्यांच्या अभिरुचीतील भिन्नपणा जाणवू लागला. प्रस्थापितांच्या वाङ्मयीन अभिरुचीपेक्षा नव्याने उदयास आलेल्या प्रतिभावंत कलावंताला प्रस्थापित होण्याचा मोह पडू लागला त्यामुळे आपल्याला जगमान्यता कशी मिळेल हे तो शोधू लागला. येथे त्याला वाङ्मयीन अभिरुची जोपासताना प्रस्थापितांकडून शोषणाला बळी पडावे लागले. कलावंतील ही लाचारी बंद व्हावी म्हणून लघुअनियतकालिकांचा जन्म झाला.

वाङ्मयीन शोषण, कलावंताच्या वाटयाला येणारी लाचारी व प्रस्थापित होण्याचे आकर्षण, आमिषे झुगारून जुल्मी सत्तेचे तुकडे करण्यासाठी बंडाचा झेंडा रोवला. त्यामध्ये केशवसुतांच्या तुतारीचा आवेश होता. तर 'सारस्वतांनो! सावध असा तुफानाची हीच खरी सुरुवात आहे', अशी सुर्व्यांची डरकाळी होती. लघुअनियतकालिकांच्या जन्माची व त्याच्या कार्याची दिशा स्पष्ट करताना सतीश काळसेकर व वसंत गुर्जर म्हणतात, "व्यवस्थेत मान्यतेच्या संकुचित होत जाणाऱ्या क्षेत्राचा विस्तार करणे, व्यवस्थेत व्यक्तिच्या वाटयाला

येणारी लाचारी नष्ट करून व्यक्तिचे असाधारणत्व जगू देण्यासाठी लिटल मॅगझिनच्या' द्वारे प्रतिष्ठित अंकाव्यतिरिक्त सरसहा लेखन प्रसिध्द करणे"[1] प्रस्थापित वाङ्मयीन व्यवस्थेतील लाचारी नष्ट करण्याचाच प्रयत्न हया लघुअनियतकालिकांच्या चळवळींच्या उदयातून दिसून येते. लघुअनियतकालिकांविषयीची व्यक्तिवादी भूमिका मांडत असताना अरूण खोपकर म्हणतात, "लहान्या मासिकाची सर्वात थोर गोष्ट म्हणजे कोणालाही लहाने मासिक काढता येते. आणि आपल्याला जे काही म्हणायचे असेल ते थोडयाशा लोकांपर्यंत पोचवता येते. हयाकरता आपली मते आणि संपादकांची मते असली भानगड नाही. जे सांगायचे आहे ते सरळ स्वतःच्या जबाबदारीवर परिणामाबद्दल आपण जिम्मेदार नंतर लोकांना निषेधसभा घेऊ देत किंवा तुरूंगात टाकू देत किंवा कचऱ्याच्या पेटीत टाकू देत."[2] प्रस्थापित समाजव्यवस्थेचा आवाज किती बुलंद असतो व या आवाजामुळे व्यक्तिची किती गळचेपी होते हयाविषयी खोपकर आपले मत व्यक्त करतांना दिसून येतात.

लघुअनियतकालिकांचा लढा हा कुण्या एका व्यक्तीचा लढा नाही तर तो उभरत्या समाजाचा प्रस्थापित समाजाविषयीचा लढा आहे हे लक्षात येते. हयाविषयी बोलताना सतीश काळसेकर, वसंत गुर्जर म्हणतात, "आमच्या लिखाणाचा दर्जेदारपणा आम्ही गृहितच धरला असल्याने आमच्या व्यतिरिक्त इतर कोणीतरी आपल्या लिखाणावर संपादकिय अधिकार चालवावा हे पटेनासे झाले."[3] लघुअनियत –कालिकांच्या संपादक मंडळींनी त्यांच्या लेखनाविषयीचा दर्जा आधी लक्षात घेतला आहे. हे करीत असताना त्याविषयीच्या लेखनावर संपादकीय अधिकार चालविण्याचा हक्कही कुणाला त्यांनी दिला नाही. हे जास्त महत्वाचे वाटते.

आपल्या भूमिकेविषयी 'शब्द' चे संपादक रमेश समर्थ म्हणतात, "सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिपाक म्हणून आज स्वतंत्र प्रज्ञेला दाबून ठेवण्याचा आणि सर्जनशील कलात्मक प्रवृत्तीवर कुऱ्हाड घालण्याचा युगाचा प्रयत्न जो होत आहे त्याला सक्रिय विरोध म्हणून 'लिटल मॅगझिन' काढण्याची गरज मला भासली"[4] समर्थ हयांच्या विधानामधून त्यांच्यातील बंडखोरपणा लक्षात येतो. त्यांच्यामधील विरोधाची भूमिका ही अतिशय जोरकसपणाची आहे. 'साहित्यसंवाद' आपल्या भूमिकेत म्हणते, "साहित्यात आणि साहित्यातील 'जीवनाचा अर्थ' एखाद्या वादातून, तत्वातून, पक्षाच्या धोरणातून, साहित्यबाहय प्रवृत्तीतून न लावता तो जाणिवांशी प्रामणिक राहून लावण्यास आम्ही बांधलेले आहोत. अशारीतीने जाणिवांशी प्रामाणिक राहत असताना बाहय परिस्थितीत इतकी आत्मपरिक्षणाची आत्मचिकित्सेची आवश्यकता असते. आत्मचिकित्सेला लागणारे निर्मळ वाङ्मयीन वातावरण निर्माण करणे, सर्व जुन्या नव्या त्याज्य प्रवृत्तीपासून अलिप्त राहून वाङ्मयातून जीवनाचा शोध घेणाऱ्या वाङ्मयीन प्रवृत्तीचा शोध घेणे, त्या वाढीस लावणे व त्यांची जोपासना करीत वाङ्मयाच्या कक्षा वाढवीत राहणे हेच साहित्यसंवादाचे अढळ ध्येय राहणार आहे."[5] साहित्याचा संवाद हा जाणिवांशी केंद्रिभूत झालेला आहे. वाङ्मयातून जीवनाचा शोध घेण्याचा व वाङ्मयीन मूल्ये जोपासण्याचा ध्येयवादी दृष्टिकोण साहित्यसंवाद ही संस्था, हे लघुअनियतकालिक करताना दिसून येते.

लघुअनियतकालिकांच्या संदर्भात आपली भूमिका मांडत असतातना 'त्रिशंकू' चे संपादक म्हणतात, "व्यवस्थेचा विरोध हाच सगळयांचा उद्देश आहे हे खरे असले तरी उद्देश आणि मार्ग यात बरीच तफावत दिसून येते. जो ओझी वाहण्याचे नाकारतो तो बंडखोर असतो. प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द संघर्ष अशी भाषा आपण जेव्हा बोलतो तेव्हा विशिष्ट प्रकाशकांशी, जातींशी किंवा पंथाशी आपले वैर नसते. प्रस्थापितपणा युगाचाच सर्वव्यापी भाग असतो. ते संपूर्ण रूप बदलवून नवीन रचना करणे हे प्रचंड ताकदिचे काम आहे ...... छापखाने, प्रकाशने, विद्यापीठे, सरकार राजकीय पक्ष, कलासंमेलने, दवाखाने, चित्रपट एकूणच संपूर्ण जीवनात पाय रोवून बसलेल्या प्रस्थापितपणालाच विरोध केला पाहिजे."[6] व्यवस्थेचा विरोध हा सगळयांचा उद्देश जरी असला तरी बंडखोरांची भाषा वेगळीच असते. त्यांच्याशी वैर करणे हे प्रचंड ताकदीचे काम आहे. कलाकृतीच्या आकृतीबंधाचा विचार न करता तिच्यातील आशयाचा विचार आधिक्याने व्हायला पाहिजे म्हणजेच निर्मितीच्या मूळ स्त्रोतापर्यंत जाता येईल.

लघुअनियतकालिकांमधील संपादक मंडळी ही साठोत्तरी मराठी साहित्यातील असंतुष्ट लेखकांची पिढी होय. त्यामुळे त्यांचा स्वातंत्र्यप्रियतेवर अधिकच दृढ विश्वास होता. आणि म्हणूनच त्यांच्या अतिस्वातंत्र्यप्रियतेवर प्रस्थापित कलावाद्यांनी टीकेचा सूर धरला. हा अतिरेक पाहता काही लघुअनियतकालिकांनीही आपली वेगळी चूल मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. 'तापसी', 'अबकडई' या अनियतकालिकांच्या दर्जात्मकतेशी स्पर्धा करण्यासाठी 'अर्णव' हे लघुअनियतकालिक बाहेर पडले. 'अर्णव' च्या पहिल्या अंकात आपली भूमिका मांडताना ते म्हणतात, "लैंगिक विचार चालविणे म्हणजेच आधुनिक विषयाला स्पर्श करणे, प्रस्थापित नीतिमूल्यांना लाथा मारणे म्हणजेच क्रांती, औचित्याला आणि सभ्यतेला धक्का देणे म्हणजे प्रयोगशीलता अशा भ्रांत कल्पनांनी पछाडलेले आमचे

'तापसी' जेव्हा स्वच्छ पांढऱ्यावर काळे करू लागतात तेव्हा वाङ्मयभिरूचीचे इंद्रिय असणाऱ्या कोणालाही त्याचा मुकाबला करण्यासाठी सावरून बसावेच लागते. आजची मराठी लघुकालिके अर्थशून्य आणि ओंगळ प्रकारांना प्रतिष्ठा देताना दिसत आहेत. त्यातील बहुतेक प्रयोग म्हणजे निव्वळ गुलामीच्या अनुकृती होत. आज या अनियतकालिकांतून वाहणारी ही घाण कशी थांबवावी हा चिंतेचा विषय होय. मोठी रेघ मारणे हाच क्षुद्र रेघेवरचा विजय होय, हे जर खरे असेल तर 'अर्णव' मोठी रेघ मारू इच्छितो."[7]

## लघुअनियतकालिकातील समष्ठीची कविता :

1960 ते 1970 च्या दशकातील नवकविता ज्वलंत काव्यप्रेरणांनी ओतप्रोत भरली होती. पराकोटीची महत्त्वाकांक्षा, बंडखोर बाणा, जिवनातील अतिवतरल संवेदनांना स्पर्श करण्याची हिंमत व टीकाकारांना तोंड देत बेडरपणाने वावरणारा बाणा हया कवींच्या अंगी दिसून येतो. लघुअनियतकालिकांमधून पुढे आलेल्या कवींचे कवितासंग्रह अनेक अनियतकालिकांमध्ये असलेला त्यांचा सहभाग हया सर्वांमधून ही कविता समाजमान्यतेकडे सरसावू लागल्याचे दिसते.

सुरुवातीला मार्क्सवाद, दलित, वास्तववाद व अतिवास्तववादाच्या छाया हया कवितेवर पडल्या. हया असंतुष्ट कवींच्या पिढीमध्ये सर्वंकश जाणीव असल्याने विद्रोही भावनांचा उद्रेक अधिकच होता. यामधून दलित कवितेने स्वयंपूर्ण आकार घेत आपले तत्त्वज्ञान सिद्ध केले. राजा ढाले, नामदेव ढसाळ हयांची कविता आपल्या सामर्थ्यबळावर लघुअनियतकालिकांमधून प्रकाशित झाली. 'चक्रवर्ती' मधून राजा ढालेंनी तर 'फक्त' मधून बाबूराव बागुल हयांच्या विद्रोहाच्या कवितांनी विद्रोही जाणिवेचे रणशिंग फुंकले. 'पॅन्थर कविता' या लघुअनियतकालिकातील ज. वि. पवार, दादाभाऊ साळवे, अशोक बनसोडे, रतनकुमार पाटलिपुत्र, धुरंधर मिठबावकर, रामदास आठवले, अरूण कांबळे, अरविंद निकाळजे, एसेम अन्धरीकर, सी. रा. जाधव, नरेन्द्र पाटील, उमाकांत रणधीर, सुधाकर गायकवाड इत्यादी कवींनी दलित जाणिवेची कविता लघुअनियतकालिकांमधून लिहिली. प्रस्थापितांच्या सांस्कृतिक लढयांशी लढा देताना पॅन्थर कवींची 'पॅन्थर कविता' म्हणून हया कवितेने आपली वेगळी ओळख निर्माण केली.

पॅन्थर कवितांविषयी बोलताना अक्षयकुमार काळे म्हणतात, "या कवितेचा नायक व्यक्ती नसून समाज आहे. समाजमनातील हलकल्लोळ या कवितेतील हेलकावा आणि लय बनतो समाजातील घडामोड कवितेची घडामोड घडवते. कारण या कवितेची पाळेमुळे जीवनाच्या तळाशी साचलेल्या विषमतेत आणि सांस्कृतिक दुभंगलेपणात खोल लपलेली आहेत."[8] समाज विषमतेनी पायेमुळे व सांस्कृतिक, विषमता 'पँथर' कवितांमध्ये दिसून येतात. एकंदरच लघुअनियतकालिकांतील कविता अभ्यासात असताना त्यामधील कवींचा व कवितांचा धांडोळा घेण्यात आलेला आहे. हयावरून असे दिसून येते की, हया कवितेची एक स्वतंत्र भूमिका आहे. निश्चित अशी ठोस तीजवळ दिशा आहे. तिला तिचा स्वतंत्र आकार आहे असेही आढळून येते. यामध्ये मार्क्सवादी कवितेची नेहमीच गळचेपी झाल्याचे दिसते. लघुअनियतकालिकांमधील कवितांमध्येही तीच जाणीव आढळते. अस्तित्ववाद आणि वास्तववादाची छाया लघुअनियतकातील अनेक कवींवर दिसून येते. अरूण कोलरकर भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, चंद्रकांत खोत, सतीश काळसेकर इत्यादी कवींच्या कवितेत ही जाणीव व्यक्त होते. हयावरून असे दिसून येते की, लघुअनियतकालिकांच्या वाङ्मयीन चळवळीतून सर्वसमावेशक भूमिका जपणाऱ्या असंतुष्ट बंडखोर पिढीची कविता जन्मास आली. हया कवितेने वाङ्मयीन वर्तुळात एक वादग्रस्तता निर्माण करून आपली पृथगात्मता सिध्द केली.

## निष्कर्ष :

1) लघुअनियतकालिकांमधील कवितेची जडणघडण ही महानगरीय पर्यावरणातून झाली आहे.
2) साठोत्तरी मराठी कवितेतील बंडखोर वळणाची कविता ही लघुअनियतकालिकांच्या चळवळीतून उदयास आली आहे.
3) लघुअनियतकालिकातील कविता ही 'असंतुष्ट पिढी' ची कविता म्हणून ओळखल्या जाते.
4) प्रयोगशीलता, अश्लीलता, पावित्र्यविडंबन, नवीनता, अतिवास्तवता जुगुप्सा व महानगरीरीय आक्रोश ही लघुअनियतकालिकांतील कवितेची वैशिष्टये आहेत.
5) लघुअनियतकालिकांमधून सर्वहारा शोषित समूहातील कवींच्या वेदनेला टाहो फोडला आहे.

6) अंतिम सत्य माणूस हेच लघुअनियतकालिकांतील कवितेचे केंद्र राहिले आहे.

## संदर्भ :


1) सतीश काळसेकर – वसंत गुर्जर : अक्षयकुमार काळे हयांच्या 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, 1999 पृ. 506 वरून उद्‌धृत
2) अरूण खोपकर : 'अबकडई' अंक पाच, मुंबई, 1972, पृ. 12
3) सतीश काळसेकर – वसंत गुर्जर : 'अबकडई' अंक पाच, मुंबई, 1972, पृ. 1
4) रमेश समर्थ : उनि. पृ. 507
5) साहित्यसंवाद : उनि. पृ. 507
6) त्रिशंकू : (संपा) तत्रैव, पृ. 508
7) अर्णव : (संपा) तत्रैव, पृ. 505
8) अक्षयकुमार काळे : 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' उनि. पृ. 51





**प्रमोद भाऊरावजी लेंडे**
**संशोधक विद्यार्थी , स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.**


LBP PUBLICATION